ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २९ जानेवारी, १९५८ | अंक ५

## विविध माहिती

**दिल्ली ते चंदीगड आरामशीर बस** — दिल्लीपासून चंदीगडपर्यंत प्रवास करणारी एक आरामशीर मोटारगाडी सुरू करण्याचें पंजाब सरकारनें ठरविलें आहे. दोन शहरांमधील अंतर ह्या गाड्या पांच तासांत तोडतील. बसच्या भाड्याचा आकार दुसऱ्या वर्गाच्या रेल्वेप्रवासाइतका असेल. ह्या मार्गावरील वाहतूक यशस्वी झाल्यास राज्यांतील इतर दूर अंतराच्या प्रवासासाठीहि अशाच गाड्या चालू करण्यांत येतील.

**बुटांच्या जोडांची निर्यात**—देशांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या मालाला बाजारपेठ मिळवून देणें व इतर साह्य करणें ह्यासाठी भारत सरकारनें नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन स्थापन केलेलें आहे. कॉर्पोरेशननें रशिआच्या मागणीप्रमाणें २,५०,००० बुटांच्या जोड्या निर्यात केल्या आहेत. बूट तयार करण्याचें काम देशांतील कारखान्यांना वाटून देण्यांत आलें होतें.

**जपानचें नवें विमान**—जपाननें जेटवर चालणारें एक नव्या प्रकारचें विमान तयार केलें आहे. ह्या विमानाची चांचणी नुकतीच करण्यांत आली. चांचणीचा निकाल जाहीर करण्यांत आला नाहीं. पण एका जपानी वैमानिकानें असा अंदाज व्यक्त केला आहे कीं, हें विमान दर तासाला ७७८ मैल प्रवास करण्याच्या कुवतीचें असावें.

**शिशापासून सोनें उत्पन्न करणार**—रशिअन शास्त्रज्ञ शिशापासून रासायनिक प्रक्रियेनें सोनें तयार करण्याच्या प्रयत्नांत असून त्यांना जरूर ती कृति लवकरच साध्य होण्याची शक्यता आहे. अशुद्ध खनिज धातूपासून शुद्ध धातू बनविण्याची नवीन पद्धत त्यांना सापडली आहे. ह्या पद्धतींत अणुशक्तीचा उपयोग करण्यांत येत आहे. त्यामुळें एक नवें 'धातुनिर्मिती शास्त्र'च उदयाला येईल.

**कॉसमॉस बँकेची पानसुपारी व तिळगूळ-समारंभ**—दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि. ची स्थापना दिन १८ जानेवारी हा आहे. त्यानिमित्त व मकरसंक्रांतीनिमित्त शनिवार, दि. १८-१-१९५८ ह्या दिवशीं बँकेंत पानसुपारी व तिळगूळ-समारंभ साजरा करण्यांत आला.

**शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी**— चीननें आपल्या शेतीच्या उत्पादनांत झपाट्यानें वाढ करण्याची मोहीम काढली आहे. ह्या मोहिमेचा एक भाग म्हणून ग्रामीण विभागांना लाखों ट्रॅक्टर्स पुरविण्याचें मुक्रर करण्यांत आलें आहे. शेतकऱ्यांकडून आलेल्या मागण्यांवरून त्यांना १,२०,००० छोट्या ट्रॅक्टर्सची तांतडीनें गरज असल्याचें दिसून येत आहे. शक्य तर सर्व ट्रॅक्टर्स चीनमधील बनावटीचेच पुरविण्यांत येतील.

**कलकत्ता बंदरासाठी यंत्रसामुग्री**—भारतामधील बंदरांची माल चढविण्या-उतरण्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी परदेशांत यंत्रसामुग्री खरेदी करण्यांत येत आहे. भारत सरकारच्या खरेदी मंडळानें कलकत्ता बंदरासाठी २ कोटी रुपयांच्या यंत्रसामुग्रीच्या मागण्या परदेशी कारखान्यांतून नोंदल्या आहेत.

**मुलांच्या चित्रकलेचें प्रदर्शन**— आग्नेय आशिआंतील मुलांनीं रंगविलेल्या चित्रांचें एक प्रदर्शन न्यूयॉर्क येथें भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत चाळीस चित्रें ठेवण्यांत आलीं होतीं. चित्रकलेच्या नमुन्यांत भारत, पाकिस्तान, जपान, सयाम, कोरिआ आणि फिलिपाइन्स इतक्या देशांतील मुलांनीं पाठविलेलीं चित्रें होतीं. प्रदर्शन दिल्ली येथील 'शंकर्स वुइकली' तर्फे भरविण्यांत आलें होतें.

**इजिप्तमध्यें दारूबंदीचा कायदा**—इजिप्तच्या पार्लमेंटमध्यें पुढील महिन्यांत दारूबंदीच्या कायद्याचें बिल मांडण्यांत येणार आहे. बिलांतील कलमाप्रमाणें दारू तयार करणें, ती आयात करणें, तिची विक्री करणें अगर ती घेणें, या गोष्टींना बंदी घालण्यांत येणार आहे. फक्त कांहीं धार्मिक प्रसंगाकरितां व प्रवाशांच्या करतां बंदी थोडी ढिली करण्यांत येणार आहे.

**धान्य टंचाईवर नवा तोडगा**—भारताच्या एक उपमंत्री श्रीमती लक्ष्मी मेनन सध्यां ऑस्ट्रेलिआच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनीं सिडने येथें असे उद्गार काढले कीं, भारतामधील गृहिणींना शिक्षण देऊन सरकार अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न सोडवीत आहे. खाण्याच्या संवयी बदलणें, स्वयंपाकाची पद्धत बदलणें व नासधूस थांबविणें ह्यासंबंधीं, त्यांना शिक्षण देऊन हा प्रश्न सोडवितां येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## तुमचें स्थान कोणतें ?

( लेखक : श्री. वा. काळे, किं. २ रु. )

प्रा. ना. पां. गुणे, दयानंद कॉलेज,
एम्. ए. सोलापूर

" तुमचें स्थान कोणतें ? " हें पुस्तक पूर्ण वाचलें. एकादें टेक्स्टबुक वाचावें, अशा आस्थेनें, प्रसंगीं अधोरेखादि महत्त्व-दर्शक चिन्हें करून वाचलें. त्यांत आपण अत्यंत सहृदयतेनें पण बारकाईनें अवलोकन करून ' परस्पर–संबंध ' शास्त्राच्या अनुरोधानें अत्यंत योग्य अशा सूचना केल्या आहेत, असें वाटतें. शेजारीपाजारी मंडळीमध्यें तें वाचून त्यावर बौद्धिकें देण्याचा कार्यक्रम सौ. करीत आहे, असें सांगितल्यावर पुस्तकाची उपयुक्तता आणखी नव्यानें प्रस्थापित करण्याची जरूर नाहीं. अशीं दैनंदिन समाजजीवनास उपयोगी पुस्तकें मराठींत कमी आहेत. आपल्या परिश्रमानें आपण ती उणीव खास दूर करीत आहांत. भाषाहि सोपी व संभाषणोपयोगी ओघवती, अशीच आहे. ह्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या लवकरच निघतील, असा भरंवसा वाटतो.

१०–११–१९५७ ना. पां. गुणे

## सेंट्रल बँक ऑफ इंडियाची नफा वांटणी

३१ डिसेंबर, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी, सेंट्रल बँक ऑफ इंडिआ लि. ला, गेल्या वर्षांतील शिलकी नफा धरून, एकूण १,२६,९७,६४१ रु. निव्वळ नफा झाला.

खालीलप्रमाणें विनियोग केलेला आहे.

| | रु. |
|---|---|
| ३० जून, १९५७ अखेरच्या सहामाहीचें ॲड-इंटेरिम डिव्हिडंड ( (१२% करमाफ ) १२,५८,१७० शेअर्सवर, प्रत्येकीं रु. १ = ५०. = | १८,८७,२५५ |
| बँकेच्या इन्व्हेस्टमेंट्सकडे वर्ग | १५,००,००० |
| करासाठी तरतूद | १३,००,००० |
| स्टाफ ग्रॅच्युइटी फंडाकडे वर्ग | ६,५०,००० |
| स्टाफ बोनससाठीं तरतूद | ३०,००,००० |
| | ८३,३७,२५५ |

उरलेल्या ४३,६०,३८६ रु. चा विनियोग. पुढीलप्रमाणें करावा, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे.


| | रु. |
|---|---|
| ३१ डिसेंबर, १९५७ अखेरच्या सहामाहीचें फायनल डिव्हिडंड ( १६% करमाफ म्हणजे १२,५८,१७० शेअर्सवर प्रत्येकीं २ रु. ) म्हणजे संबंद्ध वर्षासाठी १४% डिव्हिडंड होतें. | २५,१६,३४० |
| पुढील वर्षांत ओढावयाचा नफा | १८,४४,०४६ |
| | १,२६,९७,६४१ |

**मोक्षगुंडम् विश्वेश्वरअय्या व्याख्यानमाला**—हैद्राबादें येथें इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एकॉनॉमिक्समध्यें दरसाल " मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या व्याख्यानमाला " गुंफली जाईल. प्रत्येक वर्षाच्या सर्वोच्च अर्थशास्त्रज्ञाला ती गुंफण्यासाठी निमंत्रण केलें जाईल. म्हैसूर सरकार व्याख्यानमालेचा सर्व खर्च करणार आहे.


बचतीतून राष्ट्रसेवा
बचत करा — समृद्ध व्हा.
तुमच्या समृद्धीवर राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे.
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.


शाखा: फोर्ट, दादर, माहिम, खरकी, पुणें, बेळगांव.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा
श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,१४,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ६५,००,०००चे वर
बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B. } मॅनेजिंग डायरेक्टर्स
श्री. नी. ना. क्षीरसागर

किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २९ जानेवारी, १९५८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पश्चिम जर्मनीकडून भांडवल मिळणें अशक्य

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेले देश शक्य ती मदत करीत आहेत. ह्या बाबतींत पश्चिम जर्मन सरकारची भूमिका त्या सरकारचे भारतामधील वकील, डॉ. मेलचर्स ह्यांनीं स्पष्ट केली आहे. कलकत्ता येथें पत्रकारांना उद्देशून बोलतांना ते म्हणाले कीं, पश्चिम जर्मन सरकार भारताला दीर्घ मुदतीचें कर्ज देऊं शकेल कीं नाहीं ह्याविषयीं सध्यां विचार चालू आहे. तथापि नजीकच्या भविष्यकाळांत पश्चिम जर्मनींतून भारतांत फारसें भांडवल गुंतविलें जाण्याची शक्यता नाहीं. रुरकेला येथें जर्मनीच्या मदतीनें उभारण्यांत येत असलेल्या कारखान्याच्या यंत्रसामुग्रीची किंमत उशीरां घेण्याचें पश्चिम जर्मन सरकारनें भारताच्या विनंतीवरून कबूल केलें आहे. किंमत देण्याची मुदत १९६१ पर्यंत ठेवण्यांत आली आहे. भारतानें आपलें औद्योगीकरण करण्याचे जे प्रयत्न चालविले आहेत त्याबद्दल जर्मन सरकारला फार आस्था वाटते. पश्चिम जर्मनीनें आपल्या अर्थव्यवस्थेची घडी मुख्यतः अमेरिकेच्या मदतीनें पुन्हां चांगली बसविली आहे. गेल्या महायुद्धानंतर ती पार ढासळून गेली होती. असें असलें तरी सध्यां पश्चिम जर्मनींतच भांडवलाचा खूप तुटवडा आहे. चलनाचें अभिसरण मात्र खूप आहे. उपलब्ध असलेल्या भांडवलाची, अर्थव्यवस्था अधिक विकसित करण्यासाठी, जर्मनीलाच गरज आहे. अमेरिकेनें भारताला ज्याप्रमाणें कर्ज दिलें आहे त्याप्रमाणें कर्ज देणें पश्चिम जर्मनीला शक्य होणार नाहीं. भारताच्या पश्चिम जर्मनीशीं होणाऱ्या व्यापाराकडे नजर टाकली तर असें दिसून येतें कीं, अमेरिका व ब्रिटन ह्यांच्या खालोखाल जर्मनीचा अनुक्रम लागतो. भारताच्या आयात व्यापारांत जर्मनीचा अनुक्रम तिसरा लागतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## रशिअन शास्त्रीय वाङ्मयाला अमेरिकेची वाढती मागणी

गेल्या वर्षांत ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभीं रशिआनें पृथ्वीभोंवतीं फेर धरणारा पहिला कृत्रिम उपग्रह आकाशांत सोडला. त्यामुळें सर्व जगाचें, विशेषतः शास्त्रज्ञांचें लक्ष रशिआंतील शास्त्रीय प्रगतीनें एकदम वेधून घेतलें. तत्पूर्वी ह्या प्रगतिकडे व रशिअन शास्त्रीय वाङ्मयाकडे कोणी फारसें लक्ष देत नसे. पण आतां हा मनु पालटला आहे. आतां मात्र पाश्चिमात्य देशांत व अमेरिकेंत सुद्धां रशिआंतील शास्त्रीय वाङ्मयाची मागणी वाढत चालली आहे. ही मागणी पुरविण्याच्या मार्गांतील पहिली मोठी अडचण म्हणजे हें वाङ्मय रशिअन भाषेंत असतें, ही होय आणि दुसरी म्हणजे त्या वाङ्मयाचें इंग्रजींत भाषांतर करून तें प्रसिद्ध करण्यास लागणारा अवाढव्य खर्च. रशियांत निरनिराळ्या शास्त्रीय व तांत्रिक विषयांना वाहिलेलीं सुमारें ३०० तरी नियतकालिकें आहेत. त्यांतल्या त्यांत रशिअन ॲकॅडमी ऑफ सायन्स ह्या संस्थेचे अहवाल विशेष महत्त्वाचे असतात. कारण, ह्या अहवालांतून शास्त्रीय दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या निवडक संशोधनात्मक लेखांचा संग्रह केलेला असतो. एखाद्या रशिअन नियतकालिकाचें इंग्रजींत भाषांतर करून तें प्रसिद्ध करण्यासाठी दरसाल सुमारें २५,००० डॉलर्स खर्च येतो. ह्या हिशोबानें वरील ३०० नियतकालिकांचें प्रकाशन करावयाचें म्हटल्यास सालीना ७५ लाख डॉलर्स खर्च करावे लागतील. आतां अमेरिकेंतील कांहीं सरकारी व निमसरकारी खात्यांनीं मागणी केल्यामुळें न्यूयॉर्क व लंडनमधील एका प्रकाशन संस्थेनें हें काम हातीं घेतलें आहे. रशिअन शास्त्रीय संशोधनाची माहिती अशा रीतीनें उपलब्ध होऊं लागल्यास संशोधनाची द्विरुक्ति टाळतां येईल आणि रशिआच्या शास्त्रीय प्रगतीविषयीं सावधहि राहतां येईल.

## जपानकडून बोटी मिळविण्याचा प्रयत्न

जपानकडून कर्ज मिळविण्याच्या वाटाघाटी करण्यासाठी भारताचे प्रतिनिधी टोकिओला गेले आहेत. जपानी अधिकाऱ्यांचा असा अंदाज आहे कीं, सुमारें १,८०० कोटी येन अथवा ५ कोटी डॉलर्स इतकें कर्ज मिळण्याची शक्यता आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून विजेची यंत्रसामुग्री, कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री, इत्यादि भांडवली माल विकत घेण्याचा विचार चालू आहे. त्याचप्रमाणें, सागरी वहातुकीसाठी जपानकडून कांहीं बोटी बांधवून घेण्याची खटपटहि करण्यांत येणार आहे. टोकिओमधील 'मिटसुई' बोटबांधणी कंपनीनें ह्या कल्पनेचें विशेष स्वागत केलें आहे. कारण, गेल्या कांहीं महिन्यांत जपानी बोटबांधणीच्या कारखान्यांकडे येणाऱ्या बोटींच्या मागण्या मंदावलेल्या आहेत. भारतामधील कांहीं व्यापाऱ्यांतर्फे जपानी कारखान्यांना असें सुचविण्यांत आलें आहे कीं, भारतासाठी त्यांनीं प्रत्येकीं १०,००० टन वजनाच्या १२ बोटी बांधाव्या. त्यांपैकीं आठ बोटी मालवाहतुकीला उपयोगीं पडण्यासारख्या आणि चार उतारूंच्या प्रवासाला लायक असाव्यात. बोटींची किंमत चुकती करण्यासाठी अशी योजना सुचविण्यांत आली आहे कीं, बांधणीच्या करारावर सह्या करण्याच्या वेळीं २० टक्के किंमत रोख देण्यांत यावी. उरलेली किंमत दरसाल वार्षिक हप्त्यानें देण्यांत यावी. मात्र, वार्षिक हप्त्यांची सुरवात १९६१ सालानंतर करण्यांत यावी. म्हणजे, बोटींच्या किंमतीपैकीं कांहीं भाग रोख घेतल्यावर उरलेली किंमत उशीरां देण्याच्या पद्धतीचा स्वीकार करण्यांत आला आहे. भारताच्या विस्तृत समुद्रकिनाऱ्याचा विचार करतां सागरी वहातुकीचें महत्त्व ठळकपणें लक्षांत येतें. ही वहातूक व्यवस्थित चालण्यासाठी भारतांत बोटी बांधण्यांत येत आहेतच पण, त्याचबरोबर परदेशांकडून बोटी सुलभतेनें मिळाल्यास तेंहि इष्टच होईल.

**आशिआंतील देशांना मदत**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आशिआ विषयक आर्थिक मंडळाच्या कमिटीची बैठक बँकॉक येथें भरली होती. ह्या बैठकींत रशिअन प्रतिनिधीनें आशिआंतील देशांना आर्थिक विकासासाठी कर्जे देऊं केलीं. त्याचप्रमाणें ह्या देशांतील अर्थव्यवस्था स्थिर व्हावी म्हणून तेथील प्रमुख माल घेण्याचे दीर्घ मुदतीचे करार करण्याचीहि तयारी दाखविली.

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचें संमेलन

येथील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स या संस्थेचें वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषक-वितरणसमारंभ येथील पुणें कँटोनूमेंट बोर्डाचे चेअरमन व मुंबई लेजिस्लेटिव्ह कौंसिलचे सभासद श्री. डी. बी. आगरवाल, बी. ए. यांचे अध्यक्षतेखालीं पुणें महानगरपालिका विद्यालयाचे जागेंत साजरा झाला. सौ. शशिप्रभा आगरवाल, बी. ए., यांचे हस्तें बक्षिसें देण्यांत आलीं. प्रारंभीं संस्थेचे चिटणीस श्री. शं. ह. धूपकर यांनीं स्वागतपर भाषण केल्यावर कार्याध्यक्ष श्री. भाऊसाहेब क्षीरसागर यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली. नंतर संस्थेचे मुख्याध्यापक श्री. अ. ग. भोपटकर, यांनीं संस्थेचा अहवाल निवेदन केला व श्री. व. द. रिसबूड यांनीं स्नेहसंमेलनाचा अहवाल निवेदन केला. संस्थेचे संस्थापक प्रा. ग. कृ. भोपटकर यांनीं भाषण करून संस्थेची वाढ कशी झाली तें सांगून गतकालांतील आठवणींना उजळा दिला. संस्थेची प्रगति झपाट्यानें होत असल्याचें सांगून संस्थेच्या पुढील कार्यास जनतेनें व सरकारनें सढळ हातानें मदत करणें जरूर व अगत्याचें असल्याचें त्यांनीं सांगितलें. यशस्वी विद्यार्थ्यांना सौ. आगरवाल यांचे हस्तें पारितोषिकें वाटल्यानंतर माननिय अध्यक्ष श्री. आगरवाल यांनीं भाषण केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या व्यापारविषयक व व्यावहारिक ज्ञानाची महती सांगून तें प्रत्येक नागरिकास कसें आवश्यक आहे तें स्वानुभवावरून सांगितलें. संस्थेच्या प्रगति व वाढीविषयीं समाधान व्यक्त करून संस्थेनें पुणें कँप विभागांत आपली एखादी शाखा सुरू करावी असें सुचविलें व तसें केल्यास शक्य ती सक्रिय मदत देण्याचें आश्वासन दिलें. विद्यार्थ्यांस यथोचित उपदेश करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

शेवटीं हारतुरे व आभारप्रदर्शन होऊन राष्ट्रगीतानें या गोड समारंभाचा शेवट झाला. संस्थेच्या विद्यार्थिनींनीं "सुशिक्षित सासुरवास" व विद्यार्थ्यांनीं "साष्टांग नमस्कार" हे नाट्यप्रयोग सादर केले.

---

## सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेंत
## रजिस्ट्रार साहेबांचें आश्वासन

मुंबई राज्याचे रजिस्ट्रार, डॉ. शेख यांनीं सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेस दि. २४-१-५८ रोजीं भेट दिली. बँकेचे चेअरमन श्री. नी. आ. कल्याणी यांचें स्वागतवर भाषण झालेनंतर डॉ. शेखसाहेब यांचें भाषण झालें. त्यांनीं बँकेच्या कार्याबद्दल प्रसंशोद्‌गार काढले. "इतःपर लँड मॉर्गेज बँकांची पुनर्घटना होऊन कोणत्याहि प्रकारची अडचण कामकाजांत येऊं देणार नाहीं. बँकेनें शेतकरी बांधवांना जरूर तेवढें कर्ज उत्पादन वाढीकरितां देणेचें आहे. जिल्हा लँड मॉर्गेज बँकांना विहीर, विहीर दुरुस्तीकरतां रु. ४,००० पर्यंतचे व इतर कारणकरितां रु. २,००० पर्यंतचे अर्ज मंजूर करणेचे सर्व अधिकार दिले जातील. तसेंच मध्यम मुदतींचें कर्ज देखील लँड मॉर्गेज बँकेमार्फत देवविण्याचे जरूर ते प्रयत्न केले जातील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार मुंबई राज्यांत ३५०० विहिरी काढणेच्या आहेत व तगाईप्रमाणेंच लँड मॉर्गेज बँकेकडील विहिरींचे कर्जास देखील रु. २,५०० कर्ज व रु. ५०० मदत मिळणेची आहे" असें त्यांनीं जाहीर केलें.

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें-१

(नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें-१)

विद्यालयाचा पुढील शिक्षणवर्ग दि. १ एप्रिल १९५८ पासून सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब-ऑडिटर, खरेदी-विक्री संघ आणि विविध कार्यकारी सहकारी सोसायटी वगैरे संस्थांचे सेक्रेटरी, या दर्जाच्या नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे.

सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस. एस. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमींत कमी तीन वर्षे नोकरी केलेली असली पाहिजे आणि ते इंग्रजी १० वी, व्हर्नाक्युलर फायनल किंवा सेक्रेटरी शिक्षण वर्ग परीक्षा उत्तीर्ण असले पाहिजेत. एस. एस. सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना खाजगी उमेदवार म्हणून प्रवेश मिळूं शकेल. तसेंच वरीलप्रमाणें शैक्षणिक पात्रता असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

प्रवेश दिलेल्या सोसायट्यांचे उमेदवारांना दरमहा रु. चाळीस प्रमाणें विद्यावेतन (स्टायपेंड) मिळेल व प्रात्यक्षिक शिक्षणाचे मुदतींत रु. ६० प्रवासभत्ता मिळेल. खाजगी उमेदवारांना विद्यावेतन मिळणार नाहीं.

सहकारी संस्थांत नोकरी करणाऱ्या उमेदवारांनीं, आपल्या संस्थेच्या ठरावाच्या नकलासह प्रवेश-अर्ज, आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी बोर्डामार्फत आमचेकडे दि. २८ फेब्रुआरी १९५८ पूर्वीं पोहोंचतील अशा बेतानें पाठवावेत. परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाहीं. खाजगी उमेदवारांनीं आपले अर्ज परस्पर विद्यालयाकडे पाठवावेत. या उमेदवारांनीं अर्जासोबत प्रवेश फी पाठवूं नये.

विद्यालयाचे प्रवेशअर्ज व माहितीपत्रकें यांची किंमत आठ आणे (५० नये पैसे) आहे. फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत सुट्टीचे दिवसांखेरीज रोज ११-३० ते ५ व शनिवारीं सकाळीं ८-३० ते ११ या वेळांत मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं आठ आणे रोख भरणें किंवा आठ आण्यांचीं (५० न. पै. चीं) तिकिटें पाठविणें आवश्यक आहे.

मा. वि. मद्दाने
सुपरिन्टेन्डेन्ट

---

**दंत वैद्यकाचीं ५ कॉलेजें**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत भारतांत पांच ठिकाणीं दंत वैद्यकाचीं कॉलेजें काढण्यासाठी भारत सरकारनें १५० लाख रुपयांची तरतूद केली आहे. त्याशिवाय देशांतील जिल्ह्यांच्या ठिकाणीं २५० दंतरोगविषयक सल्लागार केंद्रेंहि स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी आणखी १५१ लाख रुपये खर्च करण्यांत येतील.

**सीलोनमध्यें साखरेचा कारखाना**—सीलोनचें सरकार आणि एक झेकोस्लोव्हाकिअन कंपनी, ह्यांच्यामध्यें करार करण्यांत येऊन सीलोनमध्यें साखरेचा कारखाना काढण्याचें ठरलें आहे. ह्या कारखान्यासाठी व तेथील कामगारांच्या घरांसाठी २,१५,००,००० रुपये खर्च येईल. कारखान्यासाठी लागणारा ऊंस सरकारचें शेतकी खातें पुरविणार आहे.

# प्रो. काळे यांच्यासंबंधीं कांहीं आठवणी

( लेखक : श्री. बापूसाहेब गुप्ते )

प्रो. काळे दिवंगत झाल्याला ता. २७ जानेवारी १९५८ रोजीं एक तप होतें. त्या निमित्तानें त्यांच्या स्मृतीला मी श्रद्धांजली वाहत आहें.

सामान्यतः प्रो. काळे व मी एकच काम करण्याचा संभव नव्हता. परंतु प्रो. काळे यांच्या एका प्रशंसनीय वृत्तीमुळेंच तें घडून आलें. प्रो. काळे वयानें माझ्यापेक्षा बरेच मोठे आणि मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी नसल्यामुळें त्यांच्यांत व माझ्यांत गुरुशिष्याचें नातेंहि निर्माण झालें नव्हतें. ज्या सुमारास मी सार्वजनिक कार्यांत पदार्पण केलें त्यावेळीं प्रो. काळे टॅरिफ बोर्डाचे सभासद होते. यावरून त्यांच्यामाझ्यांत किती अंतर होतें याची कल्पना येईल. शिवाय राजकारणांत ते व मी भिन्न पक्षांचे अभिमानी. त्यामुळें तें व मी एकत्र येण्याचा संभवच कमी होता. परंतु १९३० च्या सुमारास पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेत तें घडून आलें. त्यावेळीं बँकेला कोठार कर्ज आणि सरकारी प्रॉमिसरी नोटांची खरेदी-विक्री यांत बराच तोटा झाला होता आणि त्यामुळें भागीदारवर्गांत एकप्रकारची अस्वस्थता निर्माण झाली होती. बँकांच्या कांहीं हितचिंतकांना असें वाटलें कीं, एखाद्या वजनदार तज्ज्ञाला बँकेच्या कारभारांत लक्ष घालावयास लावणें जरूर आहे आणि साहजिकच त्यांचें लक्ष प्रो. काळे यांच्यासारख्या अर्थशास्त्रज्ञाकडे गेलें. प्रो. काळे यांना त्यावेळीं अखिल भारतीय कीर्तीच्या अर्थशास्त्रज्ञांत स्थान प्राप्त झालें होतें आणि त्यामुळें या मंडळींना अशी भीति वाटली कीं त्यांच्या सारख्याला जिल्हा सहकारी बँकेसारख्या एका छोट्या संस्थेंत बोलावलें तर त्यामुळें त्यांना राग नाहींना येणार ? सबब भीतभीतचहि मंडळी त्यांचेकडे गेली. परंतु प्रो. काळे यांचें मनांत मोठेपणाच्या खोट्या कल्पना नव्हत्या. ते म्हणाले, "माझ्यामुळें एखाद्या चांगल्या संस्थेचें हित होणार असेल तर काम करण्यास माझी केव्हांहि तयार आहे." "मला डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन केलें पाहिजे" अशासारखी कांहीं अट सुद्धां त्यांनीं घातली नाहीं. याप्रमाणें त्यानंतर लवकरच होणाऱ्या बोर्डाच्या वार्षिक निवडणुकींत त्यांचें नांव सुचविण्यांत आलें आणि ते सहज निवडूनहि आले. मीहि त्यावेळेस निवडून आलों होतों आणि पुढें ५–६ वर्षें त्या संस्थेंत आम्हीं एकत्र काम केलें. बँकेच्या कारभारांत बहुतेक बाबतींत त्यांचें व माझें एकमत होत असल्यामुळें त्यांचे व माझे संबंध अधिकाधिक घनिष्ठ होत गेले. या बँकेतून निवृत्त झाल्यानंतर महाराष्ट्र बँकेच्या संस्थापनेच्या कामांत सहकारी म्हणून मला त्यांनीं बोलाविलें आणि त्या बँकेंतहि आम्ही एकत्र काम केलें. वयानें मीं त्यांच्यापेक्षा बराच लहान असूनहि त्यांनीं मला नेहमीं समवयस्क मित्रत्वाच्या नात्यानें वागविलें याचें मला कृतज्ञतापूर्वक स्मरण राहील.

कोणत्याहि संस्थेच्या कारभारांत साधारणतः सलोख्यानें आणि तडजोडीच्या वृत्तीनें काम चालावें, असें प्रो. काळे यांचें सामान्यतः धोरण असें. परंतु एका प्रसंगीं मात्र त्यांचा निर्भीड निग्रहीपणा चांगलाच प्रत्ययास आला. संस्थेच्या हिताच्या दृष्टीनें एक गोष्ट होणें अत्यंत आवश्यक आहे असें त्यांचें ठाम मत झाल्यानंतर वैयक्तिक भाडभीड न मानतां खंबीरपणें त्यांनीं त्या गोष्टीचा आग्रह धरला. "ही गोष्ट तरी झाली पाहिजे नाहींतर मी संस्था सोडली पाहिजे" अशा निकरावर ते आले. प्रो. काळे यांचे सहकारी या गोष्टीला प्रतिकूल नव्हते. तरीसुद्धां ती गोष्ट अशा स्वरूपाची होती कीं, प्रो. काळे यांनीं इतका निग्रहीपणा दाखविला नसतां तर ती घडून आली नसती.

कोणतीहि गोष्ट अभ्यासपूर्वक करणें हा त्यांचा सद्गुण नेहमीं अनुभवास येत असे. डायरेक्टरबोर्डाचे चेअरमन असतांना बोर्डाच्या सभेच्यापूर्वी सभेपुढें येणारें प्रत्येक प्रकरण ते समग्रपणें वाचून ठेवीत. केवळ शेवटचा शेरा वाचून त्यांचें समाधान होत नसे. पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या वार्षिक हिशेबतपासणींत एकदां सरकारी ऑडिटरनें घेतलेल्या एका आक्षेपांत हिशेब ठेवण्याच्या पद्धतीसंबंधीं कांहीं मुद्दा होता. त्याला साधार उत्तर देतां यावें म्हणून प्रो. काळे यांनीं बुककीपिंग आणि अकौन्टन्सीचीं कांहीं पुस्तकें खरेदी केलीं आणि त्यांचा अभ्यास सुरू केला !

ज्या मंडळींनीं प्रो. काळे यांना पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या डायरेक्टर बोर्डांत येण्याची विनंती केली, त्यांचा तो उपक्रम त्यांच्या अपेक्षेपेक्षाहि अधिक यशस्वी झाला; कारण प्रो. काळे त्या बँकेंत जे आले ते तेथेंच थांबले नाहींत त्यानंतर ते एकंदर सहकारी चळवळींतच खूप लक्ष घालूं लागले आणि पुढें ते स्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेंत गेले आणि इन्स्टिटयूटचे एक आधारस्तंभ बनले. ते आतांपर्यंत जगले असते तर स्वातंत्र्योत्तर काळांत, पंचवार्षिक योजनांत, सहकारी चळवळीला जें अभूतपूर्व महत्त्व प्राप्त झालें आहे तें पाहून त्यांना फार आनंद झाला असता.

सहकारी चळवळींत जरी ते उत्साहानें भाग घेत होते तरी तिच्या मर्यादा, अडचणी आणि दोष यांची त्यांना जाणीव होती. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीसंबंधीं त्यांना तळमळ होती. परंतु सहकारी चळवळीच्या चौकटींत राहून याबाबतींत आपणांस फारसें कांहीं करतां येणार नाहीं असें त्यांना वाटल्यावरून त्यांनीं महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेच्या कामीं पुढाकार घेतला.

महाराष्ट्र बँकेच्या कामीं त्यांनीं पुढाकार घेतला, पण 'अर्थ' साप्ताहिक तर त्यांनीं केवळ स्वतःच्या हिंमतीवर सुरू केलें. त्यांत त्यांची लोकशिक्षणाबाबतची तळमळ प्रतीत होते. प्रो. काळ्यांच्या निधनानंतर त्यांच्या चिरंजीवांनीं सांधा बेमालूम सांधावा अशा रीतीनें "अर्थ" साप्ताहिक चालविलें आहे, हें त्यांस निःसंशय भूषणावह आहे. प्रो. काळे यांच्या या वाङ्मयीन अपत्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो आणि त्याच्या हातून महाराष्ट्राची सेवा अधिकाधिक होवो असें इच्छितों.

**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक :–श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**तुमचें स्थान कोणतें ?**

लेखक : श्री. वा. काळे

पृ. सं. ११० ] ◆ [ किं. १ रु.

## "दक्षिणेश्वरीं गंगास्नान"

### चरखा तंत्रज्ञ, श्री. काळे, ह्यांना श्रद्धांजली

१९३५ चे सुमारास मुंबईजवळील खार येथील श्रीरामकृष्ण आश्रमाशीं माझा योगायोगानेंच परिचय घडून आला. श्रीरामकृष्ण परमहंस यांचें चरित्र व स्वामी विवेकानंद यांचें चरित्र व ग्रंथ मजकडून वाचून झाले. श्रीरामकृष्णमठ–मिशन–या जगभर पसरलेल्या संन्यासी संस्थेचा व त्यांतील मोठमोठ्या संन्यासी मंडळींचा परिचय–लाभ मला झाला. या एवढ्या झालेल्या लाभावर मी खूष होतों. कलकत्त्याला आश्रमाचे मुख्य आधार जे श्रीरामकृष्णपरमहंस त्याची कर्मभूमि; दक्षिणेश्वरी त्यांची उपासक देवता कालीमाता; बेलूर येथें मठाचें आद्यपीठ व तेथें अमेरिकन धनिकांनीं बांधलेलें मोठें श्रीरामकृष्णमंदिर आहे, या गोष्टी ऐकण्यांत मला फार आनंद वाटत आहे. पण माझ्यापुरत्या मला त्या सर्व गंधर्वनगरींतल्याच गोष्टी वाटत. मला स्वतःला तीं स्थळें कधीं पहावयास मिळतील अशी माझी कल्पनाहि नव्हती व स्वतःच्या मर्यादांची कल्पना असल्यामुळें तशी कोणती अपेक्षासुद्धां माझ्या मनांत कधीं डोकावलेली नव्हती. आज जसा इंग्लंड–अमेरिकेचा प्रवास मला करावयास मिळेल हा विचार सुतराम असंभवनीय आहे, तितकेंच मी कलकत्त्यास जाणें असंभवनीय होतें.

अशा स्थितींत १९५० च्या सुमारास एक मोठें महत्त्वाचें पेटंटचें काम मजकडे लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रिअल म्युझिअमकडून आलें. पेटंटच्या कायद्याचा अभ्यास करण्याची संधि म्युझिअमचे डयुरेक्टर कै. रावसाहेब घारपुरे ह्यांनीं प्रत्यक्ष काम देऊन पूर्वींच दिली होती, त्याचा मला फायदा झाला. महात्मा गांधींनीं मागें चरख्याची स्पर्धा लावली होती. त्या स्पर्धेत सर्वश्रेष्ठ चरखा तयार करणारे महाराष्ट्रीय यंत्रज्ञ श्री. ग. भा. काळे यांनीं बनविलेल्या 'ऑटोस्पिनर' याचें पेटंट घेण्याचें काम मजकडे आलें. श्री. काळे यांचे जांवई श्री. गो. चि. कानिटकर हे बी. ई. झालेले होते; व त्यांचा माझा चांगला परिचय होता. श्री. काळे व श्री. कानिटकर यांनीं मजवर संपूर्ण विश्वास टाकला, मला भरपूर पाठबळ दिलें व माझी कल्पनाहि नसतांना मला कलकत्त्यास आग्रहानें पाठविलें. नव्या क्षेत्रांतील काम म्हणून तर मी कलकत्त्यास जाणें पत्करलेंच, पण त्याहीपेक्षा मला दक्षिणेश्वर व बेलूर मठ पहावयास मिळेलव परमपवित्र गंगास्नान घडेल म्हणूनहि मी कलकत्त्यास जाण्यास तयार झालों.

कलकत्त्यास जातांना–मे १९५१–मला अनपेक्षित अडचणीहि आल्या. पुण्याहून मुंबईस जातांना आमच्या आगगाडीच्या डब्यांत एक लेकुरवाळी बाई एकटीच प्रवास करीत होती. तिच्या मुलानें तासभर रडून आकांत मांडला होता. पावडरीचें दूध करण्यासाठी तिला ऊन पाणी पाहिजे होतें. मी एका स्टेशनावरच्या चहावाल्याकडून तिच्या पितळी भांड्यांत उकळतें पाणी आणलें. तेवढ्यांत गाडी हालल्यामुळें भांड्याला रुमाल लावून मी धांवत सुटलों. पाणी हेनकळून माझीं सारीं बोटें भाजून गेलीं व त्यांना टपोरे फोड आले. पुढें कलकत्त्याचें ६५ रुपयांचें इंटरचें तिकीट रिझर्व्ह करून आणलें तर मुंबईच्या लोकलच्या गर्दीत माझ्या विजारीच्या खिशांतील तें तिकीट ठेवलेलें व आणखी २०–२५ रुपये असलेलें पाकीटच खिसेकापूंनीं उडवलें; व मला दुसरीं तिकिटें काढावीं लागली, प्रवासास निघण्याच्या आदल्या रात्रीं एका नातेवाईकास भेटण्यासाठी व त्यांच्याचकडे रात्रीं झोंपावयाचें म्हणून मी ग्रँटरोड नाना चौकांतून ट्रॅमनें सी. पी. टँककडे निघालों तों नेमका 'कर्फ्यू ऑर्डर' पुकारलेल्या भागांत पोलिसांच्या रोखलेल्या बंदुकांपुढें जाऊन उभा राहिलों. पण ह्या साऱ्या अडचणी मजेंत दूर झाल्या व मी कलकत्त्यास महाराष्ट्र निवासांत जाऊन पोहोंचलों; तेथें चांगला वीस दिवस मुक्काम केला व मी आणि श्री. काळे यांचा मुलगा कु. उदय अशा आम्हीं दोघांनीं आमच्या आयुष्यांतील कांहीं सुखाचे नि भाग्याचे दिवस तेथें अनुभवले. आमचें कामहि यशस्वी झालें.

मुंबईहून 'रत्नागिरी हापूस' ची करंडी मी बरोबर नेली होती. विनम्र भावानें मी पहिल्याच दिवशीं बेलूर आश्रम पाहिला, गंगोदकास स्पर्श केला व माझी सुदाम–भेट प्रभुचरणीं ठेवली. दुसरा दिवस सोमवार होता. आम्हीं दक्षिणेश्वरीं गेलों. गंगास्नान केलें. तेथील कालीमातेचें दर्शन घेतलें. देवळाच्या प्राकारांतील बारा लिंगांना पाणी घातलें. श्रीरामकृष्णांच्या निवासाची खोली पाहिली. त्यांच्या पदस्पर्शानें पुनित झालेलें तपोवन पाहिलें व कृतकृत्य झालों. कलकत्त्यांत असतांना तीन सोमवार आम्हांला लाभले व ते तीनहि आम्हीं दक्षिणेश्वरीं जाऊन असेंच सत्कारणीं लावले. असा अगदीं आकस्मितपणें मला दक्षिणेश्वरीं गंगास्नानाचा लाभ मिळाला. हा लाभ मला घडविणारे श्री. काळे सोमवार, दि. २०–१–५८ रोजीं दिवंगत झाले आहेत. त्यांना ही माझी श्रद्धांजली मी विनम्रभावानें अर्पण करतों.

— स. वा. दातार

---

### अमेरिकेंतील जाहिरातबाजीचें सर्वगामित्व

जाहिरात हा आधुनिक अर्थव्यवस्थेचा व उद्योगधंद्यांचा प्राण आहे असें समजण्यांत येतें. मालाच्या खपासाठी व इतर कारणांसाठी जाहिरात दिल्याशिवाय भागतच नाहीं अशी स्थिति सर्वच देशांत उत्पन्न झाली आहे. तथापि, जाहिरातीची पद्धत अमेरिकेइतकी इतर देशांत क्वचितच वृद्धिंगत पावलेली असेल. अमेरिकन जनतेवर निरनिराळ्या प्रकारानें जाहिरातींचा एकसारखा वर्षावच होत असतो असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. वृत्तपत्रें व नियतकालिकें ह्यांमध्यें तर जाहिराती देण्यांत येतातच. पण, रेडिओ आणि टेलिव्हिजन ह्यासारखीं आधुनिक तंत्रेंहि जाहिरातीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरलीं जातात. ह्या बाबतींत जे आंकडे जमविण्यांत आले आहेत त्यावरून असें दिसतें कीं अमेरिकन जनता दरसाल २० लाख डॉलर्स इतकी रकम जाहिरातीवर खर्च करते. रेडिओ व टेलिव्हिजन ह्या साधनांची वृत्तपत्रांतील जाहिरातींशीं खूप स्पर्धा होत असली तरी वृत्तपत्रांतील जाहिरातींचें स्थान अजूनहि चांगलें टिकून आहे. अद्यापहि लोकांपर्यंत पोंचण्याचें तें एक अतिशय प्रभावी साधन आहे. 'शिकॅगो ट्रायब्यून' ह्या वृत्तपत्राला जाहिरातीपासून दरसाल ५·९ कोटी डॉलर्सचें उत्पन्न मिळते. त्याच्या खालोखाल 'न्यूयॉर्क टाइम्स' ला दरसाल ५·३ कोटी डॉलर्सचें उत्पन्न होतें. केवळ मालाचा खप होण्यासाठीच जाहिराती देण्यांत येतात असें नाहीं. अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी जी मागील निवडणूक झाली त्यावेळीं रिपब्लिकन पक्षानें आपल्या उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी एका प्रमुख जाहिरात संस्थेची मदत घेतली होती. ह्या संस्थेनें आखलेल्या कार्यक्रमाप्रमाणेंच रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करण्यांत आला. केवळ आर्थिक बाबतींतच नव्हे, तर राजकारणांतहि जाहिरातबाजी पोंचली आहे.

## अचूक अन्नविषयक आंकडेवारीचें महत्त्व

अन्नविषयक आंकडेवारीनें पोट भरत नाहीं हें खरें असलें तरी अन्नविषयक गरजांच्या नियोजनांत त्याची मदत खासच होते. ही आंकडेवारी उपलब्ध नसल्यास आपल्याकडे अन्नाची तूट किती आहे आणि जादा अन्नाची किती तरतूद करावी लागेल तें समजणार नाहीं. महापूर, अवर्षण, यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगीं विश्वासार्ह अशी अन्नविषयक आंकडेवारी उपलब्ध नसल्यास, आपत्ति ओढवलेल्या विभागांतील परिस्थितीशीं, इतर विभागांतील अन्न–उपलब्धतेच्या व्यवस्थेंत बिघाड केल्याशिवाय, मुकाबला करणें जवळ जवळ अशक्य होईल. त्याचप्रमाणें शेतकरी आणि ग्राहक या दोघांसहि बाजारपेठेंत सतत वाजवी दरांनीं अन्नधान्यें देणें वा घेणें ही गोष्ट विश्वासार्ह आंकडेवारी उपलब्ध असली तरच शक्य होईल.

भारतांत १६ व्या शतकांतहि अन्नधान्यविषयक आंकडेवारी गोळा करण्याची पद्धत अस्तित्वांत होती. जमीनमहसूल गोळा करण्यासाठी नेमण्यांत आलेला पटवारी, त्या कामाशिवाय लागवडीखालीं असलेलें क्षेत्रफळ व पीकउत्पादनाचे अंदाज यांविषयींहि माहिती संकलित करीत असे.

### पीक–कापणीची नमुना–पहाणी पद्धति

आज पीक कापणीच्या नमुना-पाहणी पद्धतीनें ही आंकडेवारी गोळा करण्यांत येते. भारतीय शेतकी संशोधन मंडळ व भारतीय आंकडेवारीविषयक संस्थेनें दहा वर्षांहून अधिक काळ खास संशोधन करून तयार केलेल्या या पद्धतीस जागतिक अन्न व शेतकी संघटनेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांनींहि पिकांचें अंदाज बनविण्याची एक सर्वोत्कृष्ट पद्धत म्हणून मान्यता दिली असून, ती इतर अनेक देशांनींहि स्वीकारली आहे.

अन्नविषयक आंकडेवारी गोळा करण्याच्या कामाचें स्वरूपच असें आहे कीं, ही आंकडेवारी शंभर टक्के अचूक असणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें औद्योगिक उत्पादन अथवा बँक क्रेडिट, पैसा पुरवठा, यांविषयींच्या आंकडेवारीइतकी ती निश्चितहि असणार नाहीं. तथापि, श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखालील अन्नधान्य चौकशी समितीनें दाखवून दिल्याप्रमाणें, “भारतांतील अन्नविषयक आंकडेवारी गोळा करण्याच्या पद्धतीच्या दर्जांत व व्याप्तींत हळूहळू सुधारणा होत असून दहा वर्षांपूर्वींपेक्षा ती बरीच सरस आहे.”

गेल्या वर्षींच्या चढ्या किंमती लक्षांत घेऊन त्या वर्षांत अधिकृत आंकडेवारीनुसार अन्नोत्पादनांत खरोखरी वाढ झाली कीं नाहीं असा संशय व्यक्त करण्यांत आला होता. म्हणून या समितीनें स्वतःच्या निरीक्षण व चौकशीबरोबरच नियोजन मंडळाच्या कार्यक्रम मूल्यमापन संघटना, शेतकी–अर्थ संशोधन केंद्रें आणि इतर अधिकृत संशोधन संघटनाद्वारें निरनिराळ्या ठिकाणीं प्रत्यक्ष चौकशी केली आणि १९५६–५७ चें अन्नोत्पादन १९५५–५६ पेक्षा एकूण जास्त असल्याचा निष्कर्ष काढला.

निवडक शेतावरील प्रत्यक्ष पीक कापणीवरून एकरीं सरासरी उत्पादनाचा वस्तुनिष्ठ अंदाज घेणें ही गोष्ट पीक–कापणी पहाणीवरून शक्य होते. सरासरी उत्पादन हें कोठल्याहि स्वरूपाच्या आत्मलक्षी निर्णयावरून नव्हे तर कापणी केलेल्या पिकाच्या नमुन्याचें प्रत्यक्ष वजन करून ठरविण्यांत येतें व त्यांत पाहिजे तेवढी अचूकता प्राप्त करून घेतां येते. कोठल्याहि राज्याच्या सरासरी उत्पादनाच्या अंदाजांत फक्त २ टक्के चूक येत असल्यानें आणि उत्पादनाचा अंदाज ठरविण्यासाठीं पीक–कापणी पहाणींतील निष्कर्षांचा उपयोग केलेल्या विभागांतूनच बहुतेक पीक येत असल्यानें, अन्नोत्पादनाच्या अखिल भारतीय अंदाजांतील चुकीचें प्रमाण अत्यल्प असतें.

स्वातंत्र्यपूर्व कालांत उत्पादनाची आंकडेवारी सर्वसाधारणतः पिकाखालील क्षेत्रफळ, नेहमींचें उत्पादन व प्रत्यक्ष हंगामांतील परिस्थिति या तीन गोष्टींवरून ठरविण्यांत येत असे. १९४९–५० पासून मात्र पिकांखालील सर्व जमिनींचा अधिकृत अंदाज घेण्यांत येऊं लागला व पिकाच्या कापणीची नमुना–पाहणी करण्याची पद्धत सुरू झाली. यामुळें हें अंदाज अधिक वस्तुनिष्ठ स्वरूपांत मिळूं लागले.

### अखिल भारतीय अंदाज

पूर्वग्रहाची शक्यताच राहूं नये म्हणून अ. भा. अंदाज तयार करण्यांत अनेक यंत्रणा गोवलेल्या असतात. राज्य सरकारांचे महसूल अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं क्षेत्रासंबंधीची माहिती मोजणी करून गोळा करण्यांत येते. पण पश्चिम बंगालमध्यें मात्र ही माहिती नमुनापाहणीवर आधारलेली असते.

राज्यांच्या महसूल, शेतकी वा आंकडेशास्त्रविभागांतील आंकडेवारीतज्ज्ञ अशाप्रकारें गोळा केलेल्या माहितीवर हात फिरवतात. पीक कापणीप्रयोगांवर मुख्यतः आधारलेली राज्य सरकारांनीं मिळविलेली पीकउत्पादनाची आंकडेवारी राष्ट्रीय नमुना पाहणीविभागांत तपासली जाते. अ. भा. अंदाज म्हणजे राज्यनिहाय आंकडेवारीची बेरीज असते. त्यामुळें संबंधितांशीं विचारविनिमय केल्यावांचून कोणत्याहि एका यंत्रणेस त्यांत फेरबदल करतां येत नाहीं.

आंकडेवारी संकलित करण्यासंबंधांत केलेल्या सुधारणांमुळें अलीकडील वर्षांतील उत्पादनाच्या आंकड्यांची मागील वर्षांच्या तशा उत्पादनाच्या आंकड्यांशीं तुलना करणें कठीण झालें आहे. ही अडचण दूर करण्यासाठी मध्यवर्ति अन्न व शेतकी खात्यानें विविध प्रकारचे निर्देशांक प्रसिद्ध केलेले आहेत.

अन्नविषयक आंकडेवारी सुधारण्यासाठी अलीकडील कांहीं वर्षांत वाढत्या प्रमाणांत प्रयत्न करण्यांत आले. माहिती पाठविणाऱ्या सर्व प्राथमिक नोकरवर्गाच्या शिक्षणाचा दोन वर्षांपूर्वीं सुरू केलेला कार्यक्रम सर्व राज्यांत आतां पुरा झाला आहे. त्यानुसार सुमारें ३० हजार तलाठ्यांना हें शिक्षण मिळालें आहे.

---

### बेळगांव बँकेच्या रिक्रिएशन क्लबाचा स्थापना–दिन

दि बेळगांव बँक लि. च्या रिक्रिएशन क्लबाचा स्थापना–दिन सोमवार, दि. २७ रोजीं रात्रीं रावसाहेब एन. एस. गुर्तु, सेवानिवृत्त डी. एस. पी., ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. स्वागतपर भाषणानंतर अध्यक्षांचें समयोचित भाषण झालें. त्यानंतर रुक्मिणी संगीत विद्यालय, कु. किशोरी सराफ, बी. ए., इत्यादींचे गायनाचे कार्यक्रम झाले. कॉफीपानानंतर अध्यक्षांच्या सतारीचा व सुरबहारचा कार्यक्रम झाल्यावर आभार-प्रदर्शन आणि वंदेमातरम् होऊन समारंभ समाप्त झाला.

---

### महाराष्ट्र बँकेच्या पुण्यांत दोन नव्या शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या दोन नव्या शाखा पुण्यांत निघत आहेत. त्यांपैकी रास्ता पेठ शाखा सुरू झाली असून टिळक रोड शाखा फेब्रुवारींत लवकरच सुरू होईल.

**पाकिस्तानला वीज पुरवठा बंद**—पंजाबमधील जोगींद्रनगर वीजनिर्मितीच्या केंद्रापासून पश्चिम पाकिस्तानला करण्यांत येणारा विजेचा पुरवठा ह्या महिन्याच्या अखेरीपासून बंद करण्यांत येणार आहे. पंजाब सरकारला ही वीज आपल्या प्रदेशांतील गरजा भागविण्यासाठी पाहिजे आहे. पाकिस्तानला आतांपर्यंत २,५०० किलोवॅट वीज पुरविण्यांत येत होती.

**लंडनमधील प्रजासत्ताक दिन**—भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त लंडनमधील एशिआ फिल्म सोसायटीतर्फे 'परदेशी' हा चित्रपट दाखविण्यांत आला. १५ व्या शतकांत बहामनी व विजयनगर राज्यांच्या कालांत भारतांत आलेल्या एका धाडसी रशिअन प्रवाशाच्या जीवनावर तो आधारलेला आहे. चित्रपटांत रशिअन व भारतीय कलाकारांनी भूमिका केलेल्या आहेत.

**उत्पादन वाढविण्यासाठी सहकार्य**—कामगारांच्या कामाच्या परिस्थितींत सुधारणा करून कापडाच्या उत्पादनांत वाढ करण्याचा प्रयोग करण्याचें अहमदाबाद गिरणी मालक संघानें ठरविलें आहे. ह्या बाबतींत तेथील कापड गिरणी कामगार-संघानें सहकार्य करण्याचें कबूल केलें आहे. आर्थिक दृष्ट्या तोट्यांत चालणाऱ्या सात निवडक गिरण्यांत हा प्रयोग लवकरच अंमलांत आणण्यांत येणार आहे.

**सुवर्ण महोत्सवानिमित्त टिस्कोचे बोनस शेअर्स**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या डायरेक्टरांनीं कंपनीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त भागीदारांना बोनस शेअर्स जाहीर केले आहेत. प्रत्येक पांच भाग धारण करणारास एक भाग बोनस म्हणून मिळेल. ह्या निर्णयास कॅपिटल इश्यूज कंट्रोलरची मान्यता घ्यावयाची आहे. गेल्या वर्षी कंपनीनें नवे ऑर्डिनरी भाग विकले, त्यावरील प्रीमिअमची रक्कम आणि रिझर्व्हपैकी थोडी रक्कम, ह्यांतून हे बोनसचे भाग दिले जातील.

**संततिनियमनाला विरोध**—इटलींतील मोठ्या कुटुंबांच्या असोसिएशनपुढें बोलतांना पोपमहाराजांनीं असे उद्गार काढले कीं संततिनियमनाची पद्धत ही आधुनिक समाजांतील सर्वांत दुःखकारक गोष्ट आहे. लग्नसंबंधानें होणारी संतति म्हणजे एक सामाजिक रोग आहे, असें कांहीं लोकांचें मत असून तें अतिशय हानिकारक आहे. ज्या राष्ट्रांना हा रोग झाला असेल त्यांनीं तो नाहींसा करण्याचे प्रयत्न करावे असेंहि हे लोक म्हणतात.

**भारतांत अणुशक्तीचा वापर**—मद्रास येथें झालेल्या इंडिअन सायन्स कॉंग्रेसच्या अधिवेशनाला आलेले ब्रिटिश शास्त्रज्ञ सर हॅरोल्ड हार्टले ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, भारतांत युरेनिअमचा व थोरिअमचा मोठा सांठा असल्यामुळें येत्या कांहीं वर्षांत भारतांत अणुशक्तीचें उत्पादन व वापर होऊं लागण्याची चांगलीच शक्यता आहे.

---

**चंकापूर नव्हे; चणकापूर तलाव**

"अर्थ" च्या दि. १५ जानेवारीच्या अंकांत, पृ. १८ वर मुंबई राज्यांतील इरिगेशन खात्याकडे असणाऱ्या तलावांतील पाण्याचे १-१-१९५८ दिवशींचे साठे दिले होते. त्यांतील 'चंकापूर तलाव' हा तलाव 'चणकापूर तलाव' अशी दुरुस्ती करून वाचावा. ही चूक नजरेस आणल्याबद्दल आम्हीं श्री. न. सि. जोशी, बी. ई. (सिव्हिल), एम्. आय. ई. (इं.), एम्. आर. सॅन. आय., सेवानिवृत्त सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, ह्यांचे आभारी आहों.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



स्थापना सन १९३५ — टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ **बोर्ड ऑफ डायरेक्टर्स** ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गे. गो. ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उ. भा. तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. म. बा. बेंडे, (ऑ. खजिनदार)
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.